# दरखास्त क्रमांक १/२०१७ निशाणी १२ खालील आदेश

१. धनको यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून मोजणी कामी पोलीस मदत मिळावी म्हणुन अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जावर रूनको यांनी त्यांचे म्हणने निशाणी दाखल केले आहे.

२. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. धनकोचे विधिज्ञ श्री. घुमरे यांनी असा युक्तीवाद केला की, धनको हिने ऋणको विरूध्द रे.मु.नंबर १८५/२०१२ चा दावा वाटपासाठी दावा दिलेला होता. सदर दाव्या मध्ये दिनांक २२/०९/२०१६ रोजी निकाल होवुन धनको हिस १/३ हिस्सा वाटप करून देणे बाबत आदेश दिलेला होता. सदर आदेशा नुसार धनकाने सदरची दरखास्त दाखल केलेलीर आहे. सदरची दरखास्त मा. जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचेकडुन मोजणीकामी व पुढील कार्यवाहीसाठी भुमि अभिलेख कार्यालय जामखेड यांचेकडे आलेली आहे. मे कोर्टाचे आदेशा नुसार भुमि अभिलखे कार्यालयाचे कर्मचारी मोजणी कामी दिनांक २५/१०/२०१८ रोजी दरखास्ती मधील मिळकती मध्ये गेले असता ऋणको यांनी मोजणी करणेस हरकत घेवुन त्यांना मोजणी करणेस नकार दिला त्यामुळे त्यादिवशी मोजणी होवु शकली नाही त्यामुळे धनको यांनी मोजणी कामी पोलीस मदत मिळावी म्हणुन जामखेड पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव दाखल केला. दावा मिळकतीची लवकरात लवकर मोजणी न झालेस धनकोचा असणारा कायदेशिर हिस्सा मे. कोर्टाचे आदेशा प्रमाणे मिळण्यास विलंब होणार आहे. ऋणको यांची मोजणी कामी अशीच हरकत राहिलेस मोजणी होणार नाही व धनकोवर फार मोठा अन्याय होईल. धनको हिस तिचे न्यायहक्का पासुन वंचित रहावे लागेल त्यामुळे माजणी करणेकामी पोलीस मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे.धनको पालीस मदतीचा होणारा सर्व खर्च भरणेस तयार आहे.

४. वरील सर्व बांबीचा विचार करून आणि हुकूनाम्याची लवकरात लवकर बजावणी होण्याकरिता पोलीस बंदोबस्ताची मागणीचा अर्ज खालील प्रमाणे मंजुर करण्यात येतो.

## : आदेश :

१. धनकोचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. भुमी अभिलेख कार्यालय जामखेड यांना आदेशित

करण्यात येते की, जमिनीबाबत केलेल्या वाटप तक्त्याप्रमाणे संबंधितांना जमिनीचा प्रत्यक्ष ताबा देण्याबाबतची कारवाई जामखेड पोलीस स्टेशन येथुन आलेल्या पोलीसांच्या बंदोबस्तात पार पाडावी.

**३.** धनको यांनी पोलीस मदतीचा खर्च संबंधित पोलीस स्टेशन येथे जे नियमाप्रमाणे असेल ते भरावे. तसेच धनको यांनी पोलीस स्टेशन जामखेड येथे पैसे भरल्यानंतर भुमी अभिलेख कार्यालय कोणत्या दिवशी संबंधीत कार्यालयाकडुन हुकूमनाम्याची बजावणी होणार या बाबत पोलीसांना कळवावे आणि पोलीसांनी त्यानुसार हजर राहावे.

**४.** भुमी अभिलेख कार्यालय जामखेड यांनी मोजणीसाठी आवश्यक असणारी फिस धनकोकडुन जमा करून घ्यावी, जर धनको यांनी मोजणी बाबतची फिस आपल्या कार्यालयात भरणा केली असल्यास परत त्यांच्याकडुन मोजणीसाठी फिस आकारू नये.

**५.** भुमी अभिलेख कार्यालय जामखेड आणि पोलीस स्टेशन जामखेड यांना माहीतीस्तव आणि पुढील कार्यवाही करीता प्रत पाठविण्यात यावी.

**(हाश्मी एच.ए.एच.आय.)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
जामखेड.

दिनांक : २९/०४/२०१९.